जा.क्र.नांवाशमनपा/नसका/सिआर- 22/2022
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक:- 02.03.2022

**दिनांक 04.03.2022 रोजी आयोजत करण्यात ONLINE सर्वसाधारण सभेची पुरवणी विषय पत्रिका**

**आयुक्त यांच्याकडून प्राप्त कार्यालयीन प्रस्ताव**

विषय क्रं. 01

विषय :- महानगरपालिका क्षेत्रामध्ये Autism Center सुरु करणे बाबत.

महानगरपालिका क्षेत्रामध्ये दिव्यांग व्यक्तींना विविध योजनांचा लाभ मिळणे तसेच त्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृश्टीकोनातुन केंद्र शासनाच्या नि:समर्थ (अपंग) व्यक्ती अधिनियम 2016 (The Right of Person With Disabilities Act 2016) नुसार स्थानिक स्वराज्य सस्था व जिल्हा परिषद यांच्या स्वउत्पन्नाच्या 5.00% निधीमधुन अपंगांसाठी राबविण्याबाबत नमुद आहे. वास्तविक त्या-त्या प्रवर्गातील व्यक्तींना त्यांच्या व्यक्तीगत विकासासाठी वैयक्तिक लाभाच्या योजना हाती घेणे गरजेचे असले तरी सदरचा निधी हा प्रामुख्याने त्या प्रवर्गाच्या सर्वांगीण विकासासाठी पायाभुत सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यावर खर्च होणे आवश्यक आहे. या प्रकरणी शासन स्तरावरुन योजना निश्चित करुन देण्यात आल्या आहेत.

सदर निधी हा स्थानिक स्वराज्य सस्थांच्या स्वउत्पन्नातुन खर्च करण्यात येत असल्याने कोणकोणत्या योजनांवर निधी खर्च करावा, याबाबत स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिकार असणे आवश्यक आहे. सदर खचर्चाबाबत कांही मार्गदर्शक सुचना निर्गमित करणे शासनाच्या विचाराधिन होते. यास्तव दिव्यांगांना राबविण्यात येणा-या सामुहिक योजना, व्यक्तीक लाभाचा योजनांचा समावेश करण्यात आला आहे.

सामुहिक योजना (अपंग पुनर्वसन केंद्र) राबविण्याच्या दृष्टीकोनातुन महानगरपालिकेच्या आंबेडकर नगर येथील मनपा शाळा येथे जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद व महानगरपालिका यांच्या संयुक्तक वियमाने दिव्यांगांचा सर्वांगीण विकास होण्याचे दृष्टीने Autism Center सुरु करता येऊ शकेल.

करिता सदर प्रस्तावा मनपा सर्वसाधारण सभेचीं मान्यता घेणे आवश्यक असुन सदर प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर सादर.

विषय क्रं. 02

विषय:- स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत कचरा मुक्त शहरांना तारांकित मानांकन देण्याबाबत..

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) ची अंमलबजावणी संदर्भाधीन दिनांक 15 मे, 2015 रोजीच्या शासन निर्णयान्वये संपुर्ण राज्यात ``मिशन मोड`` पध्दतीने सुरु आहे. या अभियानांतर्गत शहरे `` हागणदारी मुक्त`` करणे व घनकचरा व्यवस्थापनातंर्गत ``स्वच्छ`` करणे या दोन प्रमुख बाबींचा समावेश आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) ची अभियानांतर्गत घनकचरा व्यवस्थपनातंर्गत शहरे ``स्वच्छ`` करण्याचे काम प्रगतीपथावर आहे, तथापी, नागरी भागात व सार्वजनिक ठिकणी काही प्रमाणात होत असलेल्या अस्वच्छतेमुळे नागरिकांकडून प्रतिकुल प्रतिक्रिया व्यक्त होताना दिसून येतात.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, शहरांना कचरा मुक्त होण्याकरिता एकूणच स्वच्छतेमध्ये क्रमाक्रमाने आणखी सुधारणा होण्यास्तव शहरांना तारांकित मानांकन (Star Rating) देण्याबाबतची नियमावली (A protocol for making cities Garbage Free) केंद्र शासनाने तयार केलेली असून सदरची नियमावली राज्य शासनाने स्विकारली आहे, त्याच बरोबर राज्यातील कचरामुक्त शहरांना तारांकित मानांकनाची नियमावली लागू करण्यास मान्यता दिलेली आहे.

शहरांना कचरा मुक्त होण्याकरिता तारांकित मानांकन (Star Rating) देण्याबाबत केद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार खालीलप्रमाणे कार्यपध्दती निश्चित करण्यात येत आहे.

- कचरा मुक्त शहराच्या तारांकित मानांकनाबाबत स्वयं-घोषणा करण्यापूर्वी, शहरातील सर्व प्रभाग सदस्यांकडून संबंधित प्रभागाचे कचरा मुक्त तारांकित मानांकनाबाबत घोषणापत्र सादर करणे आवश्यक आहे.
- प्रभाग सदस्यांकडून प्राप्त झालेल्या तारांकित मानांकनापैकी जे निम्न तारांकित मानांकन असेल तेच तारांकित मानांकन त्या शहराचे तारांकित मानांकन म्हणून पडताळणीसाठी ग्राह्य धरण्यात येईल.
- प्रभाग सदस्यांकडून तारांकित मानांकनाबाबत घोषणापत्र सादर झाल्यानंतर संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी ठराव पारित करुन सार्वजनिक घोषणा करु शकतील.
- सदर घोषणेच्या अनुषंगाने जनतेच्या हरकती व सूचना 03 दिवसांचा कालावधी देवून मागवू शकतील.
- त्या अनुषंगाने महापौर/ नगराध्यक्ष/ आयुक्त/ मुख्याधिकारी यांनी प्राप्त हरकती व सूचनांची पडताळणी करुन, प्रस्तावित मानांकनाच्या बाबतीत समाधान झाल्यास, कचरा मुक्त शहराच्या तारांकित मानांकनाबाबत (1,3, 5 व 7 तारांकित पैकी कोणतेही मानांकन) स्वंय-घोषणा करावयाची आहे.
- कचरा मुक्त तारांकित मानांकनाबाबत शासनाच्या स्तरावर 1, 3, 5 व 7 तारंकित मानांकनाबाबत केंद्र शासनाकडून पडताळणी/ प्रमाणीकरण करण्यासाठी राज्य शासनामार्फत केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल.
- केंद्र शासनाने नियुक्त समितीकडून याची पडताळणी/प्रमाणीकरण करुन केंद्र शासन या शहरांचे तारांकित मानांकन जाहिर करील.
- कचरा मुक्त शहराचे तारांकित मानांकन 1 वर्षाच्या मुदतीसाठी असेल. प्रत्येक वर्षी असा प्रकारे पुनर्मुल्यांकन व पुनर्प्रमाणीकरण केले जाईल.
- कचरा मुक्त शहराचे कोणतेही तारांकित मानांकन मिळविण्यासाठी स्वंय-घोषणेच्या प्रणालीमध्ये तसेच प्रत्यक्ष शहर कचरा मुक्त करण्याच्या प्रक्रियेमध्ये शहरातील नागरिकांचा सक्रीय सहभाग असणे आवश्यक आहे.

**कचरा मुक्त शहराचे तारांकित मानांकन ठरविताना विचारात घेतली जाणारी 24 उपांगे/ बाबी पुढिलप्रमाणे आहेत.**

1) घरोघर जाऊन कचरा गोळा करणे. (Door to Door Collection)
2) कचरा निर्मीतीच्या जागीच कचऱ्याचे विलगीकरण करणे. (Segregation at source)
3) सार्वजनिक वाणिज्य व रहिवाशी भागातील साफसफाई करणे (Sweeping + Litter Bins + Secondary Storage Bins )
4) घाऊक कचरा निर्मात्यांकडुन आल्या कचऱ्यावर प्रकिया करणे – (Processing by Bulk Waste Generators
5) रोडा-रोडा संकलन (C&D Waste- Collection)
6) ओला कचऱ्यावर प्रक्रिया करणे बाबत प्रकल्पाची क्षमता (Waste Processing & Capacity-Wet Waste)
7) सुका कचऱ्यावर प्रक्रिया करणे बाबत प्रकल्पाची क्षमता (Waste Processing & Capacity-Dry Waste)
8) डम्पसाईट रिमीडेशन करणे Dumpsite Remediation

9) प्लास्टीक बंदी (Plastic Ban)

10) तक्रारींचे निवारण करणे (Grievance Redressal)

11) सेवाकर घेणे (User Charges)

12) माहिती, शिक्षण संवाद व्दारे जनजागृती करणे, तसेच क्षमता बांधणी (IEC and Capacity Building)

13) सॅनिटरी लॅडफिल (Scientific Landfill)

14) शहरांतील मोठ्या नाल्यांची व नैसर्गिक जलसाठ्यांची स्वच्छता (No visible solid waste in water bodies + Screening of Storm water drains/ Nallahs)

15) किरकोळ ठिकाणावरुन रोडा-रोडा संकलन व विलगीकरण C&D waste- Segregation (nonbulk waste generators)

16) घनकचरा कचरा प्रक्रिया केंद्रचे Geo - mapping करणे (Geo-mapping of waste processing facilities, C&D facilities, landfills, dumpsites,STPs/ FSTPs)

17) वार्डाच्या हद्दी, नाल्या, नैसर्गिक जलसाठ्यां Geo - mapping करणे (Geo-mapping of the wards i.e.ward boundaries, drains, nallahs, water bodies)

18) शहर सु-शोभिकरण (City Beautification)

19) जागेवरच ओला कचऱ्यावर प्रक्रिया करणे (On-site wet waste processing)

20) राडा-रोडावर प्रक्रिया करणे आणि पुर्नप्रक्रिया करणे (C&D waste- Processing & Recycling)

21) राडारोडा चे साहित्यांचा वापर करणे (C&D Waste- Use of materials)

22) कचऱ्यातील योग्य घटक (recycle Reuse करीता) विकणे / उत्पन्न घेणे (Sale of waste by-products)

23) घरगुती घातक व सॅनिटरी कचऱ्यावर प्रक्रिया करणे (Processing of Sanitary and Domestic Hazardous waste)

24) डिजीटल तंत्राव्दारे घनकचरा व्यवस्थापन हाताळणी (Digital Monitoring of SWM Operations (incl. City facilities)

उपरोक्त नमुद कार्यपध्दतीनुसार स्वंय-मुल्यांकन व स्वंय-पडताळणी करुन कचरा मुक्त शहराच्या तारांकित मानांकनाबाबत स्वंय- घोषणा करण्याची कार्यवाही करुन , कचरा मुक्त शहराचे तारांकित मानांकन ठरविताना विचारात घेतली जाणारी जी 24 उपांगे/ बाबी आहेत, त्यापैकी जास्तीत जास्त बाबींची प्रभावीपणे अंमलबजावणी केल्यामुळे नांदेड शहर 5 तारांकित मानांकन प्राप्त होण्यास पात्र आहे.

करीता कचरा मुक्त शहराचे 1,3,5,7 स्टार मानांकन पैकी तारांकित मानांकन देण्याबाबतचा प्रस्ताव सर्वधारण सभेच्या संमती व निर्णयास्तव सादर.

<u>स. सदस्या मार्फत आलेले प्रस्ताव/सुचना</u>

विषय क्रं. 03 — प्रस्ताव

महाराष्ट्र शासनाने संपूर्ण राज्यामध्ये दिनांक 12 मार्च 2021 पासून महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम 2021 लागू केला असून त्यानुसार नांदेड वाघाळा शहर हानगरपालिका हद्दीत महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम 2021 अन्वये दिनांक 31 डिसेंबर 2020 पर्यंतची अनाधिकृत भुखंड व बांधकाम नियमीत करण्यासाठी मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्रं. 106 दिनांक 30.08.2021 व मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्रं. 169 दिनांक 13.03.2021 अन्वये मान्यता दिली आहे व त्यानुसार दिनांक 31 डिसेंबर 2020 पर्यंतची अनाधिकृत भुखंड व बांधकाम नियमीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत मोठया प्राणावर मंजूर अभिन्यासामध्ये अनाधिकृत बांधकामे झालेली आहेत तसेच सदर बांधकामे नियमीत करण्याची नागरीकांची मागणी आहे. सदर बांधकाम नियमीत करण्याची नागरीकांची मागणी आहे. सदर बांधकामे गुंठेवारी विकास अधिनियम 2021 या अधिनियमाव्दारे नियमित केलयास मोठया प्रमाणावर महसुल प्राप्त होणार आहे. महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम 2021 कलम 24 अन्वये राज्य शासनाच्या पुर्व मान्यतेने या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी विनीयम करता येतील अशी तरतूद आहे.

करीता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील मंजूर अभिन्यासातील अनाधिकृत बांधकामे नियमित करण्यासाठी महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम 2021 कलम 24 अन्वये प्रस्ताव मान्य करुन राज्य शासनाकडे मंजुरीस्तव पाठविण्यास ही मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

सुचक :- स. विरेंद्रसिंघ गाडीवाले अनुमोदकः- तेहरा अमितसिंह, यादव प्रभा इश्वरलाल,भवरे शिलाबाई

विषय क्रं. 04

प्रस्ताव

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रं. 18 मध्ये डॉ. राममनोहर लोहिया वाचनालय शाखा खडकपुरा येथे वाचनकक्ष सध्या चालु आहे. सदरील भागातील अनेक जातीप्रवर्गातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी अभ्यासीका जवळ नसल्यामुळे सदरील चालु असलेलया वाचनकक्षा वरील पहिला मजल्याचे बांधकाम करुन त्या ठिकाणी नव्याने एक अभ्यासिका सुरु केल्यास या भागातील भरपुर विद्यार्थ्यांना अभ्यासीकेचा लाभ मिळेल व त्याचे उच्च शिक्षणाला लाभ मिळेल.

करिता वरील सर्वबाबीचा विचार करता प्रभाग क्रं. 18 मध्ये सध्या चालु असलेल्या डॉ. रामनोहर लोहिया वाचनालयाया वाचन कक्षावरील पहिला मजला बांधकाम करुन त्याठिकाणी एक अभ्यासीका सुरु करण्यासाठी लागणा-या खर्चास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

सुचक :- शोऐब आफाख स. मजहर हुसेन अनुमोदकः- अ. शमीम अब्दुल्ला साब

विषय क्रं. 05

प्रस्ताव

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दतील केंद्र व राज्य शासनाच्या धोरणामुळे बिएसयुपी योजने अंतर्गत घरकुलांचे कामे करण्यात आलेली असुन त्याच्या अनुषंगाने प्रभाग क्रं. 08 मधील नई आबादी भागातील कांही पात्र लाभार्थ्यांना घरकुलांचे घरे बांधून देण्यात आलेले नाही त्यामुळे सदरील भागातील लाभार्थ्यांना आजपावेता घरकुलांपासुन वंचीत राहीलेलेले आहे.

करिता वरील पात्र असलेलया लाभार्थ्यांना मनपाकेच्या साईट क्रं. 34 मधील उपलब्ध व रिकामी असलेल्या घरकुलांमधून सदरील लाभार्थ्यांना घकुले वितरण करण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

सुचकः- मोहीनी विजय येवनकर,उमेश चव्हाण अनुमोदकः- सलीमा बेगम नुरल्ला खान,
संदिप सोनकांबळे, मुन्तजीबोद्दीन

विषय क्रं. 06

प्रस्ताव

दिनांक 22.11.21 रोजी समंत झालेल्या ठराव क्रं. 145 व्दारे नार्मल प्रसुती करिता रुपये 800/- तसेच सिजरीयन प्रसुती करिता 1500 मोबदला देणेबाबत ठराव पारीत झाला परंतु सदरचा मोबदला अत्यल्प असून नार्मल प्रसुतीसाठी रु. 1000/- तसेच सिजरीयन प्रसुतीसाठी

रुपये 2500/- मोबदला देणे संबंधीत ठराव क्रं. 145 दि. 22.11.21 मध्ये दुरुस्ती करण्यास ही सभा सर्वानुमते मंजुरी देते व हा ठराव याच सभेत मान्य करण्यात येते.

सुचक :- स. शेर अली अनुमोदक :- रजिया बेगम बाबु खान

विषय क्रं. 07 प्रस्ताव

कु. तनवी विपीन बोरले ही मुलगी सिडको संभाजी चौक येथील असुन सदर मुलीचे –हृदय (हर्ट) व फुफुस (लंग्स) प्रत्यारोपन (Trnas plant) MGM Health Care Chennai येथे करण्यासाठी रुपये 40,00,000/- रुपये लागत आहेत मुलीचे वय 09 वर्षे असुन मुलीच्या वडीलांची परिस्थिती गरीब असुन सदरील सभागृहातील सदस्यांनी हया मुलींसाठी लागणा-या खर्चास मदत करावही व हा प्रस्ताव हया सभागृहात मंजुर करावा.

सुचक:- विनय पाटील गिरडे, इंबेबाई शिवाजीराव घोगरे

अनुमोदक :- सौ. चित्रा सिध्दर्थ गायकवाड, सौ. मंगलाताई गजानन देशमुख, सौ. दिपाली संतोष मोरे, सौ. बेबी जनार्धन गुपिले, राजु गोविंदराव काळे, शांता सभाजी गोरे, श्रीनिवास नारायण जाधव.

स्वाक्षरीत/-

(मा. महापौर यांच्या मान्यतेने)

(स. अजीतपालसिंघ संधु)
नगरसचिव
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड